Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—3

| Seat No. | |
|---|---|

**[5302]-101**

**M.A. (Part-I) (First Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 01**

(व्यावहारिक व उपयोजित मराठी, भाग-01)

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

(*iii*) **सर्व** उपप्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'मराठी लेखनात शुद्धलेखन ही एक आवश्यक संकल्पना आहे' या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

**किंवा**

खालील उत्तारा लेखनविषयक नियमानुसार दुरूस्त करून लिहा :

''ग्रथामधये केवल ज्ञानच नसते तरअनेकप्रकाराचा अनूभव साठवीलेला असतो मनाच्या आणि वीचाराच्या संपत्तीचे ते भांडारच असते म्हणून ग्रथ हे मानसाच्या जिवणाचे शील्पकार ठरतात ते णराचा णारायन करतात असे हे ग्रथ आपले गूरू असले तरि आपले शेवक आणी मीत्रहि बनुन राहतात कपाटात बसुण तूमच्या बोलावन्याचि ते वाट पाहत असतात तुम्हि त्याना स्परश करन्याचा अवकाश कि आपले सारे अतरग ते उघडुन दाखवीतात जाणति मानसे एखाद्या देशाचे मोठेपण श्रिमंती ठरवीतात ते त्यातिल सोणे रत्नहिरेजडीत संपत्तिवरून नाहि तर त्या देशात निरमाण झालेल्या ग्रथावरून''.

2. मुद्रित शोधनाची संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उत्तारा आपल्या उत्तरपत्रिकेत जसाच्या तसा लिहून त्याचे खुणांच्या सहाय्याने शोधन करा :

''ज्ञाण वीज्ञाण समा जसेवा अशा वेगवेगळ्याक्षेत्रांत समाजाची झालेली प्रगतीहे असंखय ज्ञात आणीअज्ञात माणसां च्याप्रयत्नांचेच फळआहे म्हणून प्रयत्न हाच परमेश्वर माणूण त्याच्या उपासणा करावी हादेव प्रसनन झाला कि भागयाचा यशाचा प्रगतिचा वरषाव होतो आयूष्यभर प्रयतनदेवाची पुजा बाधल्यामूळेच डॉ. अब्दूल कलाम थोर लोकोत्तर पूरुष ठरले तसेच नया राषट्रांनी प्रयतनाची पराकाष्ठा केला ता राषट्रे शुनन्यातुन उभि राहलि आणी यशाच्या शीखयवर पोहचलि इग्लड अमरीका जपाण हि त्याची आजच्या कालतिल उदहारने आहेत दव दवळाच्या गाभान्यात नव्हे तर मानसच्या मणात आणी मनगटात वास करतोहीप्रयतनवादाचि शीकवन आहे''.

3. विविध मराठी साहित्यसंस्थांच्या वाङ्‌मयीन कार्याचा आढावा घ्या.

**किंवा**

प्रकाशन संस्थेची कार्यपद्धती विशद करुन, प्रकाशन व्यवसायातील अडचणी थोडक्यात लिहा.

4. मुलाखतीचे स्वरूप स्पष्ट करुन, मुलाखतीचे विविध प्रकार लिहा.

**किंवा**

प्रशासनिक पत्रव्यवहार म्हणजे काय ? ते सांगून प्रशासनिक पत्रव्यवहाराचे स्वरूप स्पष्ट करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) ग्रंथाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ

(ब) अर्जाचे प्रकार

(क) मराठीतील अनियतकालिके

(ड) जाहिरातलेखन.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-102

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-2

### (अर्वाचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास (1818 ते 1920)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अव्वल इंग्रजी कालखंडातील वाङ्‌मयाला 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' असे का म्हटले आहे ? ते सविस्तर लिहा.

**किंवा**

अव्वल इंग्रजी कालखंडातील नियतकालिकांचे योगदान स्पष्ट करा.

**2.** 1818 ते 1874 या कालखंडातील साहित्याचे भाषांतरित स्वरूप विशद करा.

**किंवा**

महात्मा जोतिबा फुले या कृतीशिल समाजशिक्षकाच्या समग्र वाङ्‌मयाचा आढावा घ्या.

**3.** हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्याचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

1875 ते 1920 या कालखंडातील अर्वाचीन मराठी कवीपंचक कोणाला म्हणता येईल ते सविस्तर लिहा.

4. 1875 ते 1920 या कालखंडातील मराठी नाटकांची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

**किंवा**

1875 ते 1920 या कालखंडातील मराठी चरित्र आत्मचरित्रांचे स्वरूप स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भाषांतरित नाटके

(2) गोंविदाग्रजांची कविता

(3) स्मृतीचित्रे

(4) निबंधमाला.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

**[5302]-103**

**M.A. (Part I) (I Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-3**

**भाषाविज्ञान : वर्णनात्मक**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'भाषा हे दळणवळणाचे प्रभावी साधन आहे' या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

भाषा आणि भाषण भेद स्पष्ट करून, भाषा आणि कोशविज्ञान या भाषाभ्यास शाखेचा परिचय करून द्या.

2. स्वनिम विनियोगाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

समाजभाषाविज्ञान या अभ्यासकक्षेचे स्वरूप विशद करा.

3. रूपिका, रूपिम, रूपिकांतर या संकल्पना साधार स्पष्ट करा.

**किंवा**

प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पद्धतीच्या गुणदोषांची साधार चर्चा लिहा.

4. अर्थाचे विविध प्रकार सोदाहरण लिहा.

**किंवा**

अर्थ म्हणजे काय ते सांगून, घटक विश्लेषणाचे अर्थविन्यासातील महत्व विशद करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(*i*) उच्चारण आणि लेखन भेद

(*ii*) रूपिमांचे प्रकार

(*iii*) अभ्यस्त शब्द

(*iv*) भाषा आणि बोली भूगोल.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8**

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-104

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

**(1) ग्रामीण साहित्य**

***किंवा***

**(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)**

***किंवा***

**(3) तौलनिक साहित्याभ्यास**

***किंवा***

**(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या**

***किंवा***

**(5) अलंकार व छंद**

## (1) ग्रामीण साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण साहित्याचे स्वरूप सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्य प्रवाहनिर्मितीची कारणमीमांसा करा.

**2.** ग्रामीण साहित्याचे वेगळेपण, रचनात्मक की वृत्तात्मक हे स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्यातून सामाजिक-सांस्कृतिक दर्शन कसे घडते ? सोदाहरण स्पष्ट करा.

**3.** ग्रामीण साहित्यातील ललित गद्य व नाटक या वाङ्मयप्रकाराची वाटचाल स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण कथा विकासातील व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील व द.मा. मिरासदार यांचे योगदान स्पष्ट करा.

**4.** ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात कोणती भर टाकली आहे ? सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्याच्या आकलन व आस्वादासंबंधी व्यक्त केलेल्या अपेक्षांचा परामर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) ग्रामीण कादंबरीतील स्त्रीजीवन

(2) ग्रामीण साहित्याची भाषा

(3) रा.रं. बोराडे

(4) गोतावळा.

# [5302]-104

## (2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'साहित्य आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत', विधान स्पष्ट करा.

**किंवा**

'लोकप्रबोधन ही मध्ययुगीन प्रचारमाध्यमांची प्रेरणा होती'—सोदाहरण सांगा.

**2.** मराठी भाषेबद्दलचा अभिमान आणि आग्रह मध्ययुगीन साहित्यातून विशेषत्त्वाने जाणवतो—साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'यादवकाळ हा विविध संप्रदायांचा प्रेरणाकाळ आहे' या विधानाचा परामर्श घ्या.

**3.** 'लोकसाहित्याचा प्रभाव मध्ययुगीन मराठी वाङ्मय दिसतो'—साधक-बाधक चर्चा करा.

**किंवा**

'शाहिरी परंपरेतील वाङ्मयातून तत्कालीन महाराष्ट्रीय समाज-संस्कृतीचे दर्शन घडते' हे विधान साधार स्पष्ट करा.

**4.** बहामनी काळातील मराठी वाङ्मयनिर्मितीचा परिचय द्या.

**किंवा**

महानुभावीय गद्यग्रंथांचा आढावा घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) 'महाराष्ट्र' नामसंज्ञेच्या विविध उपपत्ती

(2) वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी

(3) उखाहरण

(4) मुक्तेश्वरी महाभारत.

# [5302]-104

## (3) तौलनिक साहित्याभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना स्पष्ट करून तौलनिक साहित्याभ्यासाचा अभ्यासक्षेत्रांचा परिचय करून द्या.

**किंवा**

तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व महत्व स्पष्ट करा.

**2.** तौलनिक साहित्याभ्यासातील 'प्रभाव' व 'प्रभव' या संकल्पना स्पष्ट करून त्यातील भेद स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी साहित्यावरील परकीय भाषांतील साहित्याच्या प्रभावाची चर्चा करा.

**3.** राष्ट्रीय साहित्याची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी कोणकोणत्या घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते ?

**किंवा**

विश्वसाहित्याची संकल्पना स्पष्ट करा.

**4.** मर्ढेकर व सलीम काझी यांच्या काव्यातील जीवनविषयक दृष्टिकोनाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

मर्ढेकर व सलीम काझी यांच्या काव्यातील प्रतिमांची चर्चा करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) तुलनेचे विचारप्रक्रियेतील स्थान

(2) तौलनिक साहित्याभ्यासाची उद्दिष्टे

(3) काझी सलीम यांच्या कवितेतील प्रयोगशीलता

(4) मर्ढेकर व काझी सलीम यांची काव्यशैली.

# [5302]-104

## (4) वाङ्‌मयेतिहास लेखनविद्या

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** इतिहासलेखनासंबंधीच्या विविध उत्पत्तींचा मागोवा घ्या.

**किंवा**

इतिहास ही संकल्पना स्पष्ट करून वाङ्‌मयेतिहास व अन्य प्रकारचे इतिहास यातील भेद स्पष्ट करा.

**2.** वाङ्‌मयेतिहास म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

वि.का. राजवाडे, श्री. व्यं. केतकर आणि गो.म. कुलकर्णी यांनी मांडलेल्या वाङ्‌मयेतिहास संकल्पनेचा विचार करा.

**3.** वाङ्‌मयेतिहास लेखनाचे वाङ्‌मयेतिहासकारां समोरील उद्दीष्टांनुसार कोणकोणते प्रकार होतात ते सांगा.

**किंवा**

कालक्रमवाचक, अनुबंधवाचक आणि रूपलक्ष्यी या वाङ्‌मयेतिहासाच्या प्रकारांचे विवेचन करा.

**4.** वाङ्‌मयेतिहासातील वाङ्‌मयेतिहासाची सामग्री, वाङ्‌मयेतिहासाच्या भूगोल, वाङ्‌मयीन घटना आणि वातावरण या जनसंकलपनाचा आढावा घ्या.

**किंवा**

स्वभाषकांसाठी आणि परभाषकांसाठी वाङ्मयेतिहास लेखन कसे केले जाते ते सोदाहरण लिहा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) वाङ्मयेतिहासाचा कालपट

(2) दृष्टीकोननिष्ठ वाङ्मयविचार

(3) वाङ्मयेतिहास आणि संशोधन

(4) दि.के. बेडेकर यांची वाङ्मयेतिहासविषयक संकल्पना.

# [5302]-104

## (5) अलंकार व छंद

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ‘अभिजात संस्कृत मीमांसेतील काव्यव्यापार ‘अलंकार’ या घटकानेच व्यापलेला होता.’ साधार लिहा.

**किंवा**

‘संस्कृत मीमांसेत रस, रीती, ध्वनी, गुण या सर्वांचा समावेश ‘अलंकार’ या शब्दातूनच व्यक्त होत होता. असेल तुम्हांस वाटते का ? चर्चा करा.

**2.** ‘अलंकार हा काव्याचा एक मुलभूत घटक आहे.’ चर्चा करा.

**किंवा**

अलंकाराचे काव्यातील महत्व सोदाहरण स्पष्ट करा.

**3.** छंद या संज्ञेचा मराठीत झालेला विचार सोदाहरण लिहा.

**किंवा**

छंद आणि व्याकरण या दोन घटकांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**4.** काव्यगुण ही संज्ञा सोदाहरण सांगा.

**किंवा**

‘काव्यानुभव अहंकारयुक्त असतो’ या विधानाचा सोदाहरण परमर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भामहाचा अलंकार विचार

(2) मराठीतील वृत्त संकल्पना

(3) माधव पटवर्धनांचा छंदोविषयक विचार

(4) ओवी आणि अभंग.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-201

## M.A. (Part I) (II Semester) EXAMINATION, 2018
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्रमांक-1
## व्यावहारिक व उपयोजित मराठी भाग-2
## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भाषांतराची आधुनिक काळातील प्रस्तुतता स्पष्ट करून भाषांतराचे प्रकार सांगा.

**किंवा**

खालील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

The wise men of all nations have got together to see if they can find a way of getting rid of war altogether. The first thing that is wanted is co-operation among all the nations. Co-opeartion is a big ward, but it simply means working together. If nations can learn to work together as friends, they will soon find a way of setting their disputes in a friendly way. Instead of being jealons of each other and suspicious and proud of their rights, they must learn to be friendly and reasonable and anxious to help each other. And the second thing that is wanted is the rule of law. Just as the citizens of a country have laws and agree to obey those loves, so all nations must agree to loves and feel bound to obey and support them. If all nations work together for the common good mankind, and agree to obey the loves then they will never fight each other and there will be no wars.

P.T.O.

2. निरनिराळ्या भाषा व्यवहारांतील भाषांतरांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

माहिती व जनसंपर्क अधिकाऱ्याजवळ आवश्यक असणाऱ्या कौशल्यांची चर्चा करा.

3. जनसंपर्क अधिकाऱ्याची भूमिका व कर्तव्य स्पष्ट करा.

**किंवा**

जनसंपर्काची ग्राहकविषयक व वितरक-विक्रेतेविषयक उद्दिष्टे कोणती, ते सविस्तर लिहा.

4. 'कार्यक्रमनिहाय निवेदनाचे स्वरूप बदलू शकते, या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

सूत्र संचालकाच्या भाषिक कौशल्यांचा मागोवा घ्या.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा.

(*i*) लक्ष्यनिष्ठ भाषांतर

(*ii*) 'जनसंपर्क' संकल्पना

(*iii*) जनसंपर्क कौशल्याची भाषा

(*iv*) कार्यक्रमातील आभार.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

**[5302]-202**

**M.A. (Part I) (II Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-02**

**अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1920 ते 1960)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** '1920 ते 1945 या कालखंडातील ललित साहित्यात सामाजिक व राजकीय विचारांचे प्रतिबिंब आहे.' चर्चा करा.

**किंवा**

'लघु निबंधाचे लेखन 1920 ते 1945 या काळातच झाले.' या संदर्भात चर्चा करा.

**2.** 1920 नंतरच्या कथावाङ्मयाचे विशेष साधार लिहा.

**किंवा**

नवकाव्याची वैशिष्ट्ये सांगून बा.सी. मर्ढेकर यांच्या कवितेचे वेगळेपण सांगा.

**3.** 1960 पर्यंतच्या कादंबरी वाङ्मयाचे विशेष सोदाहरण लिहा.

**किंवा**

1920 नंतरच्या काळातील मराठी नाटकाचे स्वरूप स्पष्ट करून कोणत्याही **दोन** नाटककारांचे योगदान सांगा.

**4.** समीक्षा विचारातील कलावाद आणि जीवनवाद या विचारप्रणालींचा परिचय करून द्या.

P.T.O.

**किंवा**

चरित्रात्मक वाङ्मयाचे स्वरूप व व्याख्या सांगून 1920 नंतरच्या चरित्रात्मक वाङ्मयाचा आढावा घ्या.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(*i*) 'धुक्यातून लाल ताऱ्यांकडे' (प्रवासवर्णन)

(*ii*) दिवाकर कृष्ण यांच्या कथांचे विशेष.

(*iii*) 'हिंदोळ्यावर' (कादंबरी)

(*iv*) महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-203

## M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 3

### (भाषाविज्ञान : सामाजिक भाषाविज्ञान)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** सामाजिक भाषाविज्ञानातील संकल्पनांचे साधार विवेचन करा.

**किंवा**

भाषा, समाज आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**2.** भाषा आणि आर्थिक वर्गव्यवस्था यांचा संबंध समाज भाषाविज्ञानात कशाप्रकारे मांडल आहे ते लिहा.

**किंवा**

विविध व्यवसाय क्षेत्रातील भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

**3.** भाषा, सामाजिक परंपरा, विविध सामाजिक संस्था यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

'भाषा ही लिंगभेदानुसारी बदलते'. या विधानाचा परामर्श घ्या.

4. पिजिन आणि क्रिऑल या भाषांची निर्मिती प्रक्रीया स्पष्ट करुन त्यांचे विशेष लिहा.

**किंवा**

समाजांतर्गत नवव्यवस्थांचा भाषेच्या बदलांशी कसा संबंध असतो ते लिहा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) भाषा आणि समाज

(*ii*) भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था

(*iii*) स्त्रियांची भाषा व बालभाषा

(*iv*) भाषिक भांडार व लघुक्षेत्र.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-204

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** अभ्यासपत्रिका सोडवावी.

(1) दलित साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या (भाग-2)

**किंवा**

(5) व्याकरण

## (1) दलित साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** दलित साहित्याची संकल्पना स्पष्ट करून मराठी साहित्याशी त्याचा असलेला परस्पर-संबंध विशद करा.

**किंवा**

दलित साहित्यातील विविध वाङ्मय प्रकारांची ओळख थोडक्यात करून द्या.

P.T.O.

**2.** "समूहाच्या वेदनेची कविता म्हणजे दलित कविता होय." या विधानाचा अर्थ स्पष्ट करा.

**किंवा**

"समताधिष्ठीत समाजनिर्मिती हे दलित साहित्याचे उद्दिष्ट आहे." या विधानाबद्दल चर्चा करा.

**3.** दलित नियतकालिकांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

आंबेडकरी शाहिरी वाङ्‌मयाची वैशिष्ट्ये विशद करा.

**4.** वेदना, विद्रोह व नकार ही सूत्रे दलित साहित्याचे वेगळेपण कसे सिद्ध करतात ते स्पष्ट करा.

**किंवा**

"सामाजिक व सांस्कृतिक विषमता हे दलित साहित्याचे केंद्र आहे." या विधानाचा परामर्श घ्या.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) अस्मितादर्शचे वाङ्‌मयीन कार्य

(2) तराळ-अंतराल मधील 'दलित जीवन'

(3) दलित स्त्रियांचे कविता लेखन

(4) दलित रंगभूमी.

*किंवा*

**(2) मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मराठी साहित्य प्रचाराची अर्वाचीन माध्यमे कोणती, ते स्पष्ट करा.

**किंवा**

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील प्रबोधनाचा मराठी वाङ्‌मयावर कोणता परिणाम झाला ते लिहा.

**2.** गांधीवाद व मार्क्सवाद यांचा तत्कालीन साहित्यावर संमिश्र प्रभाव पडलेला आहे. या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

अर्वाचीन मराठी साहित्याचे पाश्चात्य व भारतीय आधार स्पष्ट करा.

**3.** "1920 ते 1960 हा कालखंड अनेक वाङ्‌मयीन वादांनी गजबजलेला असलातरी कला-जीवनवाद हाच त्यातील मुख्यवाद होय." या माताचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

'नव्या स्त्रीं'चे दर्शन मामा वरेरकर, श्री. व्यं. केतकर व ना.सी. फडके यांच्या साहित्यातून कसे घडते ते स्पष्ट करा.

4. नवसाहित्याने मराठी साहित्यास दिलेल्या योगदानाची चर्चा करा.

**किंवा**

अव्वल इंग्रजी कालखंडातील मराठी साहित्याच्या वाढीस ख्रिस्ती धर्मप्रसार व नवेशिक्षण कसे पोषक ठरले ते सोदाहरण लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) आधुनिक भारत

(ब) 1930 नंतर आलेली सामाजिक समस्याप्रधान मराठी नाटके

(क) आचार्य अत्रे आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

(ड) विष्णुशास्त्री चिपळूणकर.

*किंवा*

## (3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भाषांतर म्हणजे काय ते थोडक्यात सांगून भाषांतर विषयक सिद्धान्तनाचा परामर्श घ्या.

**किंवा**

भाषांतर मीमांसेच्या प्रकारांची सविस्तर चर्चा करा.

2. भाषांतराची आवश्यकता विशद करा.

**किंवा**

भाषांतर व अनुवाद यांतील साम्य-भेद स्पष्ट करा.

3. ललित साहित्याचे भाषांतर व शास्त्रीय साहित्याचे भाषांतर यांतील फरक स्पष्ट करा.

**किंवा**

भाषांतरामागील विविध प्रेरणांचा व कारणांचा मागोवा घ्या.

4. 'हवेली वेव्हरलेची' या कादंबरीतील अनुभवविश्व उलगडून दाखवा.

**किंवा**

'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील आशयविश्वाचा परिचय करून द्या.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) कवितेचे भाषांतर

(2) मौखिक भाषांतरे

(3) यंत्र भाषांतर

(4) 'हवेली वेव्हरलेची' या कादंबरीची भाषिक वैशिष्ट्ये.

*किंवा*

(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या (भाग-2)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** बहुभाषिक राष्ट्रातील वाङ्मयेतिहासाचे स्वरूप विविध उदाहरणासह स्पष्ट करा.

**किंवा**

भारतीय वाङ्मयेतिहासाचे महत्त्व थोडक्यात सांगा.

**2.** महाराष्ट्राबाहेरील अर्वाचीन मराठी वाङ्मय व मराठी वाङ्मयेतिहास याबाबतची मीमांसा करा.

**किंवा**

मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहासातील अडचणींचे निराकरण कसा करता येईल, याविषयी विवेचन करा.

**3.** मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचा वि.ल. भावे ते महाराष्ट्र साहित्य परिषदेपर्यंतचा थोडक्यात आढावा घ्या.

**किंवा**

प्रारंभ काळात न्यायमूर्ती म.गो. रानडे यांचे वाङ्मयेतिहास विषयक कार्य लिहा.

**4.** 1947 पर्यंतच्या मराठी वाङ्मयेतिहासाचा परिचय करून द्या.

**किंवा**

मराठीतील वाङ्मयेतिहास विचारांची वाटचाल कशी झाली, ते साधार लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भारतीय वाङ्मयेतिहासाची संकल्पना

(2) माटे–बेडेकर वादाचे स्वरूप

(3) कुसुमावती देशपांडे यांच्या वाङ्मयेतिहास लेखनाचे विशेष

(4) वाङ्मयेतिहास लेखनातील संशोधनाचे महत्त्व.

*किंवा*

(5) व्याकरण

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** व्याकरण म्हणजे काय ते सांगून व्याकरण व भाषा यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

'भाषेच्या विकासात व्याकरणाचे महत्वाचे योगदान असते.' स्पष्ट करा.

**2.** 'भाषा आणि तिचे व्याकरण' हे संबंध परस्परानुवर्ती असतात' मराठी भाषा आणि व्याकरण यासंदर्भात चर्चा करा.

**किंवा**

व्याकरणाच्या वेगवेगळ्या प्रकारांची चर्चा करा.

**3.** मराठीतील शब्दजातीविषयक भिन्न मतांची चर्चा करा.

**किंवा**

विभक्तीविषयीच्या वादाचा परामर्श घ्या.

**4.** भाषा नियोजनातील व्याकरणाचे कार्य स्पष्ट करा.

**किंवा**

मोरो केशव दामले यांची आख्यातव्यवस्था विशद करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) उद्देश्य व विधेय

(2) भाषा आणि व्याकरण

(3) मराठीतील भावे प्रयोग

(4) मराठीचे पारंपरिक व्याकरण.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

**[5302]-301**

**M.A. (Part-II) (Third Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 05**

(प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार)

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वृत्तपत्रमाध्यमाची स्वरूप-वैशिष्ट्ये स्पष्ट करुन वृत्तसंस्कृती म्हणजे काय ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

विकासपत्रकारितेच्या प्रयोजनांची साधकबाधक चर्चा करा.

**2.** वृत्तपत्रीय सर्जनात्मक लेखन म्हणजे काय हे सांगून, त्याची स्वरूप-वैशिष्ट्ये उदाहरण देऊन स्पष्ट करा.

**किंवा**

पुस्तकपरीक्षणाचे अंतरंग उलगडून दाखवा आणि समीक्षकाने पाळावयाची पथ्ये सांगा.

**3.** तुम्हास आवडलेल्या एखादया गाजलेल्या मराठी चित्रपटाचे आस्वादात्मक समीक्षण करा.

**किंवा**

महाराष्ट्रातील नामवंत समाजसेवकाचा, त्याच्या कार्याच्या संदर्भात परिचय करुन द्या.

**4.** दृक्श्राव्य माध्यमांसाठी संहितालेखन करताना लेखकाजवळ कोणती लेखनवैशिष्ट्ये आवश्यक असतात, ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

प्रमाणभाषा व दृक्श्राव्यमाध्यमांची भाषा यामधील फरक सोदारहण स्पष्ट करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) प्रवासवर्णन लेखनाची वैशिष्ट्ये

(ब) संगीत कार्यक्रमाची समीक्षा

(क) एका साहित्यिकाचा व्यक्तिवेध

(ड) दृक्श्राव्य माध्यमासाठीची भाषिक कौशल्ये.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-302

**M.A. (Part II) (Third Sem.) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 6**

**साहित्य : समीक्षा व संशोधन**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'साहित्यसमीक्षेत तत्वान्वेषण, अर्थान्वेषण आणि मूल्यमापन या अखंड चालणाऱ्या प्रक्रिया आहेत. ' साधार लिहा.

**किंवा**

समीक्षेच्या विविध व्याख्या सांगून साहित्यसमीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** आदर्श समीक्षकाजवळ कोणते गुण असणे आवश्यक आहे ते सांगून रसीकता, प्रज्ञा, तुलनाक्षमता यांचा आढावा घ्या.

**किंवा**

वाङ्मयीन मूल्य आणि जीवनमूल्ये यांच्यातील संघर्ष केव्हा निर्माण होतो ते उदाहरणासह स्पष्ट करा.

**3.** समीक्षेच्या वेगवेगळ्या पद्धती सांगून चरित्रात्मक समीक्षेचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

आस्वादक समीक्षेचे स्वरूप विशद करून आस्वादक समीक्षा एक पोतडी आहे हे विधान तुम्हास पटते का ? ते साधार लिहा.

4. '1920 ते 1945 या कालखंडातील समीक्षा कोणत्या वाङ्‌मयीन वादात अडकली ?' साधार सांगा.

**किंवा**

बा. सी. मर्ढेकर, श्री. के. क्षीरसागर यांच्या समीक्षात्मक कार्याचा आढावा घ्या.

5. पुढीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) समीक्षेची उद्दिष्ट्ये

(*ii*) संगती आणि सुसूत्रता

(*iii*) मार्क्सवादी समीक्षापद्धती

(*iv*) मुक्तीबोधांची मानुषतेची संकल्पना.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-303

**M.A. (Part II) (III Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 7**

**(विशेष लेखकाचा अभ्यास-प्राचीन/अर्वाचीन)**

**प्राचीन-संत तुकाराम**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामांचा जीवन परिचय त्यांच्या अंभगाद्वारे करून द्या.

**किंवा**

'तुकारामांची वाङ्मयीन मूर्ती म्हणजे त्यांचे अभंग होय.' या विधानाची चर्चा करा.

**2.** 'संत तुकारामांची साधकावस्था म्हणजे एका ध्येयवादी आणि प्रयत्नवादी उपासकाची धारणा होय.' सोदाहरण लिहा.

**किंवा**

'कन्या सासुरासि जाये। मागे परतोनि पाहे।।' या अभंगाच्या आधारे संत तुकारामांची साधकावस्था स्पष्ट करा.

**3.** संत तुकारामांच्या उपदेशपर अभंगाचे विशेष सांगा.

**किंवा**

'तुकाराम महाराज हे मानवधर्माचे प्रवर्तक म्हणून मान्यता पावलेले संत आहेत.' स्पष्ट करा.

4. लोकशिक्षक म्हणून संत तुकारामांच्या अभंगाचा परिचय करून द्या.

**किंवा**

'अंगा लावुनिया राख। डोळे झाकुनी करिती पाप।।' या अभंगाच्या आधारे संत तुकारामांचे विचार स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) 'बरे झाले देवा निघाले दिवाळे।' अभंगाचा भावार्थ

(ब) तुकारामांची गुरूभक्ती

(क) संत तुकारामांचे नामसंकीर्तन

(ड) 'तुका झालासे कळसचे' यथार्थत्व.

## (अर्वाचीन-डॉ. द.ता. भोसले)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. प्रा. द.ता. भोसले यांच्या ग्रामीण साहित्य लेखनाची वैशिष्ट्ये सोदाहरण विशद करा.

**किंवा**

'प्रा. द.ता. भोसले यांचे साहित्य म्हणजे ग्रामीण जीवनाची उत्कट अनुभूती होय.' साधार लिहा.

2. 'ग्रामीण जीवनदर्शन त्यातील गुणवैशिष्ट्यांसह प्रा. द.ता. भोसले यांच्या 'मनस्विनी' आणि 'पाळत' हे कथासंग्रह समर्थपणे घडवितात.' कसे ते लिहा.

**किंवा**

प्रा. द.ता. भोसले यांच्या 'जन्म' आणि 'पाऊस' या कथासंग्रहातील विविध व्यक्तिचित्रे यांचा परामर्श घ्या.

3. प्रा. द.ता. भोसले यांच्या कादंबरी लेखनाची गुणवैशिष्ठ्ये साधार विशद करा.

**किंवा**

'मी आणि माझ्या बाप' या कादंबरीचे यथायोग्य मूल्यमापन करा.

4. 'पार आणि शिवार' या ललित लेखनातील ग्रामीण संस्कृतीचा परिचय करून द्या.

**किंवा**

'परिघावरची माणस' या ललित लेखनाचे वेगळेपण लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) 'पाऊस' कथासंग्रहातील वातावरण

(ब) 'जन्म' कथासंग्रहाची समर्पकता

(क) 'इथे फुलांना मरण जन्मता' कादंबरीचे अंतरंग

(ड) 'आठवणीतील दिवस' चे लेखनविशेष.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**6**

| Seat No. | |
|---|---|

**[5302]-304**

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

खालील प्रश्नपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

**(1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**(2) सौंदर्यशास्त्र**

**(3) लेखनविद्या आणि निबंध लेखन (ऐच्छिक)**

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**(1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** लोकसाहित्य म्हणजे काय ते सांगून 'लोक' व 'साहित्य' या पदांचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या राष्ट्रीय व सांस्कृतिक अनुबंध उलगडून दाखवा.

**2.** लोकसाहित्याचा इतिहास व मानववंशशास्त्र यांच्याशी असलेला परम्परसंबंध विशद करा.

**किंवा**

'लोकसाहित्य हा समाजमनाचा आरसा आहे', या विधानाचा परामर्श घ्या.

3. लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता का असते ते लिहा.

**किंवा**

लोकसाहित्य आणि अर्वाचीन साहित्य यांच्यातील संबंधाचे विश्लेषण करा.

4. लोकसाहित्याच्या अभ्यासातील अडचणी सविस्तर लिहा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासकाला अभ्यास करताना कोणती दक्षता घ्यावी लागते ?

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लोकसाहित्याचे प्रयोजन

(ब) लोकसाहित्यातील चिरंतनत्व

(क) लोकसाहित्य आणि संतसाहित्य

(ड) वाक्प्रचार, कोडी व उखाणे-भाषिक सौंदर्य

(2) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. सौंदर्यशास्त्राला 'समीक्षा संकल्पना' कशा पूरक ठरतात ते लिहा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र हे विज्ञान आहे काय ? आपली मते लिहा.

2. सौंदर्यविधान हे सार्वत्रिक की व्यक्तिनिष्ठ! सोदाहरण लिहा.

**किंवा**

सौंदर्यविधानात तार्किकतेचे महत्त्व किती व कसे ते लिहा.

3. कांटची सौंदर्य सिद्धान्तविषयक भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

सुखवादातून सौंदर्य सुखवादाची संकल्पना कशी विकसीत झाली आहे ? ते लिहा.

4. सौंदर्यानुभवातील वैश्विक जाणिवा विशद करा.

**किंवा**

सौंदर्यानुभव व्यावहारिक अनुभावाच्या पलीकडे कसा असतो ते लिहा.

5. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा : [20]

(अ) व्यावहारिक अनुभव

(ब) कलात्मक परिणाम आणि सौंदर्यशास्त्र

(क) सौंदर्यशास्त्रातील अलौकिकता

(ड) लयसिद्धान्त.

### (3) लेखनविद्या आणि निबंध लेखन (ऐच्छिक)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवन व्यवहारात संवादाचे महत्त्व सांगून विविध संवाद माध्यमांची ओळख करून द्या.

**किंवा**

सामाजिक व्यवहारातील संवादाचे कार्य सोदाहरण विशद करा.

**2.** संवादप्रक्रिया कशी घडते ते सांगून त्यातील अडथळ्यांचे विवेचन करा.

**किंवा**

संवादविषयक सिद्धान्तांचा परिचय करून द्या.

**3.** अर्थ म्हणजे काय ते सांगून अर्थनिर्मिती प्रक्रिया सोदाहरण विशद करा.

**किंवा**

अर्थ म्हणजे काय ते सांगून अर्थाचे प्रकार लिहा.

**4.** संवादात कोणकोणती कौशल्ये आत्मसात करावी बागतात, ते स्पष्ट करा.

**किंवा**

सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील संवाद कौशल्याची चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) आकाशवाणीवरील कार्यक्रमाचे संवाद कौशल्य

(आ) न्यायालयीन क्षेत्रातील संवाद कौशल्य

(इ) नाटकातील संवाद कौशल्य

(ई) शासकीय क्षेत्रातील संवाद कौशल्य.

# [5302]-304

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** महाराष्ट्राच्या जडणघडणीत वैचारिक निबंध वाङ्मयाचे योगदान सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

'तृतीयरत्न' या महात्मा फुले लिखित नाटकाचे वैचारिक अधिष्ठान स्पष्ट करा.

**2.** गो. ग. आगरकर यांच्या सामाजिक विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादी विचारांचे समालोचन करा.

**3.** आचार्य जावडेकर यांच्या 'आधुनिक भारत' या ग्रंथाचे अंतरंग स्पष्ट करा.

**किंवा**

मुकुंदराव पाटील आणि कृष्णराव भालेकर यांच्या विचारांचे तुलनात्मक विश्लेषण करा.

**4.** ताराबाई शिंदे यांनी व्यक्त केलेल्या स्त्रीविषयक विचारांची चर्चा करा.

**किंवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुधारणाविषयक विचारांची ओळख करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : [20]

(अ) बाळशास्त्री जांभेकरांची विचारदृष्टी

(ब) लोकहितवादींची लेखनशैली

(क) वि. दा. सावरकरांचे विज्ञाननिष्ठ विचार

(ड) न्यायमूर्ती रानडे यांचा उदारमतवाद.

# [5302]-304

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. ''कवी हा जन्मावा लागतो'' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

साहित्यनिर्मितीच्या संदर्भात विश्वात्मकता आणि विशिष्टता या दोन घटकांचा परिचय करून द्या.

2. सर्जनशीलतेमुळे काव्याचे विविध काव्यप्रकार कसे निर्माण झाले ?

**किंवा**

भाषिक सर्जनशीलतेमुळे वाङ्मयाचे विविध प्रकार कसे संभवतात ते सोदाहरण लिहा.

3. निबंधलेखनात सर्जनशीलता प्रयोगशील असल्यास तो ललित निबंध होईल काय ? चर्चा करा.

**किंवा**

चरित्रलेखनात सर्जनशीलतेला कितपत वाव असतो त्याचे सोदाहरण विवेचन करा.

4. लेखकाची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती लेखनाला कशी प्रभावित करते ते स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्यनिर्मितीस वाचन कसे पूरक ठरते, स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोन** टीपा लिहा :

(अ) राजशेखराची 'कवा-तपस्या'

(ब) प्रतिमेचे निर्मितीप्रक्रियेत महत्व

(क) प्रकारनिष्ठ निर्मितीचे फायदे

(ड) स्वैर निर्मितीचे तोटे.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-401

## M.A. (PART II) (Fourth Semester) EXAMINATION, 2018

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 5

### प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. वृत्तसंकलनाची संकल्पना स्पष्ट करून, 'दूरदर्शन वरील मालिका' विषयक वृत्तसंकलनाचा आराखडा तयार करा.

**किंवा**

आपल्या स्थानिक पातळीवरील सादर झालेल्या लोककलाविषयक कार्यक्रमाचे वृत्तसंकलन तयार करा.

2. माध्यमनिहाय जाहिरातीचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

दृक्-श्राव्य माध्यमासाठी 'स्वच्छता-अभियान' या जाहिरातीची संहिता तयार करा.

3. 'दृक्-श्राव्य माध्यम म्हणून चित्रपटाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.' विधानाची साधार चर्चा करा.

**किंवा**

'महिला सबलीकरण' विषयक कार्यक्रमाचे श्राव्य माध्यमासाठी वृत्तांकन करा.

4. ‘कथा’ या साहित्य प्रकारावर आधारित पटकथेचे स्वरूप सोदाहरण विशद करा.

**किंवा**

कादंबरीचे नाट्यरूपांतर करतांना कोणते बदल करावे लागतात ? सोदाहरण स्पष्ट करा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(*i*) विज्ञानप्रदर्शनाचे वृत्तसंकलन

(*ii*) जाहिरातीचा मसूदा

(*iii*) माहितीपटासाठी पटकथालेखन

(*iv*) रूपांतर एक कला.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-402

## M.A. (Part II) (IV Semester) EXAMINATION, 2018
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्रमांक-6
## (साहित्य-समीक्षा व संशोधन)
## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संशोधनाची संकल्पना स्पष्ट करून संशोधन प्रक्रियेतील विविध टप्पे विशद करा.

**किंवा**

संशोधनाच्या प्रेरणा स्पष्ट करून संशोधकाच्या आणि आवश्यक असणारे गुण विशद करा.

2. वाङ्मयेतेहासविषयक संशोधनाची व्याप्ती व स्वरूप विशद करा.

**किंवा**

मध्ययुगीन वाङ्मयाचे संशोधन करताना कोणकोणत्या गोष्टींचा विचार केला पाहिजे ते लिहा.

3. साहित्याच्या संशोधनात समाजशास्त्रीय अभ्यासाचे कसे साहाय्य होते ते लिहा.

**किंवा**

राज्यशास्त्रातील संकल्पना साहित्याच्या अभ्यासास कशा उपकारक ठरतात, ते लिहा.

4. मराठीतील लोकसाहित्याच्या संशोधनाचा सोदाहरण परामर्श घ्या.

**किंवा**

मराठीतील भाषाविषयक संशोधनाचे साधार विवेचन करा.

P.T.O.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(*i*) शिलालेख व ताम्रपट

(*ii*) संहिता संपादन व विश्लेषण

(*iii*) साहित्य आणि इतिहास

(*iv*) 'महानुभाव' वाङ्मयाचे संशोधन.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-403

**M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 7**

**(विशेष लेखकाचा अभ्यास) (प्राचीन/अर्वाचीन)**

**प्राचीन-संत तुकाराम**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामांच्या उत्तुंग प्रतिभेचा प्रलय त्यांच्या अभंग गाथेतून कसा येतो ? ते साधार लिहा.

**किंवा**

तुकारामांच्या काव्यातील छंदोरचनेचा परिचय करून द्या.

**2.** तुकारामांच्या अभंगातील काव्यविशेष स्पष्ट करा.

**किंवा**

'आंतरिक तळमळ, भावार्तता, सहजता ते तुकारामांच्या अभंग - काव्याचे विशेष होत. सोदाहरण चर्चा करा.

**3.** तुकारामांच्या अभंगातून समकालीन लोकजीवन कसे व्यक्त झाले ? ते लिहा.

**किंवा**

तुकारामांच्या अभंगातील समाज जीवनाचा परामर्श घ्या.

4. 'तुकारामांची कविता वेळोवेळी विद्रोहाची व बंडखोरीची भाषा बोलते' - कसे ते साधार लिहा।

**किंवा**

तुकारामांनी तत्कालीन समाजात कर्मकांडविरहित सोपा भक्तिमार्ग कसा रुजविला ? ते विशद करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास या अभंगाचा भावार्थ

(ब) तुकारामांच्या अभंगातील प्रतिमा

(क) तुकोबांचे नाम संकीर्तन

(ड) तुकारामांच्या अभंगातील दुर्जन निंदा.

किंवा

## अर्वाचीन - डॉ. द. ता. भोसले

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषासंवर्धनासाठी 'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' उपयुक्त ठरतो का ? साधकबाधक चर्चा करा.

**किंवा**

डॉ. द. ता. भोसले यांनी 'संस्कृतीच्या पाऊलखुणांचा' वेध कसा घेतला आहे, ते सोदाहरण विशद करा.

**2.** कृषिकेंद्रित जीवन समजून घेण्यासाठी 'चावडीवरचा दिवा' या पुस्तकाची असलेली उपयुक्तता साधार लिहा.

**किंवा**

डॉ. द. ता. भोसले यांनी 'लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य' या ग्रंथात गाडगेबाबांच्या बहुविध समाजकार्याचे विवेचन कसे केले आरे, ते विशद करा.

**3.** 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन' या याग्रंथातील डॉ. द. ता. भोसले यांच्या ग्रामीण साहित्य-चिंतनाचा परामर्श घ्या.

**किंवा**

'कुमारांचे कर्मवीर' या चरित्रग्रंथातून डॉ. द.ता. भोसले यांनी भाउरावासंबंधी कोणते विचार व्यक्त केले आहेत ?

**4.** डॉ. द. ता. भोसले यांचे ग्रामीण साहित्यातील योगदान सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

निसर्ण आणि ग्रामीण साहित्य यांच्या परस्पर संबंधाचा डॉ. द. ता. भोसले यांनी घेतलेला शोध स्पष्ट करा.

5. खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीला लिहा :

(*i*) वीरगल

(*ii*) ग्रामजीवनातील लोकाचार व लोकधर्म

(*iii*) डॉ. द.ता. भोसले यांची चिंतनात्मक शैली

(*iv*) डॉ. द. ता. भोसले यांचे ग्रामीण साहित्य चळवळीतील योगदान.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| Seat No. | |
|---|---|

# [5302]-404

**M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2018**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** अभ्यासपत्रिका सोडवावी.

(1) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(2) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

**किंवा**

(3) लेखनविद्या व निबंधलेखन

**किंवा**

(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

## (1) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** "क्रियावरोधामुळे रूपांतरित झालेली उत्कट जीवशास्त्रीय भावना म्हणजे सौंदर्यभावना," या प्रभाकर पाध्ये यांच्या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

मानवी मनातील एक भावना म्हणून सौंदर्यभावनेचे वेगळेपण स्पष्ट करा.

2. "कलाकृतीतील सेंद्रिय एकता म्हणजेच सौंदर्य होय," या आइबर्नच्या मताची चर्चा करा.

**किंवा**

'रूपा'ची संकल्पना कलाप्रकार सापेक्ष आहे, असे म्हणता येईल काय. साधार विवरण करा.

3. "जिने प्रेरणेचे समाधान होते ती गोष्ट मूल्यवान असते" या आय.ए. रिचर्ड्‌सच्या मताचा परामर्श घ्या.

**किंवा**

कलेच्या परिणामांविषयीच्या विविध दृष्टिकोनांचा परिचय करून द्या.

4. सौंदर्यशास्त्राचा अभ्यास समीक्षकाला कितपत उपयोगी ठरू शकतो ? चर्चा करा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र व समीक्षा विचारातील परस्परपूरकता स्पष्ट करा.

5. पुढीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) क्लाइव्ह बेलचा 'रूप' विचार

(2) सौंदर्यभावनेचे विशेष

(3) लिओ टॉलस्टॉयचा भावना-संक्रमण सिद्धांत

(4) सौंदर्यशास्त्र आणि साहित्य विचार.

*किंवा*

**(2) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मराठी लोकगीतांचे विषयानुरूप पडणारे प्रकार सोदाहरण लिहा.

**किंवा**

लोकगीते व संतकवींची कविता यातील अनुबंध स्पष्ट करा.

**2.** परीकथा व मालाकथेतील निवडक कल्पनाबंधांचा परिचय करून द्या.

**किंवा**

मराठी लोककथेतील प्रमुख **दोन** प्रकारांचा सविस्तर परिचय करून द्या.

**3.** गणगौळण — वग व लावणी या लोककलाविष्कारातून लोकनाट्य कसे विकसित झाले आहे, ते लिहा.

**किंवा**

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृती उपासकांचा त्यांच्या कलाप्रकारासह परिचय करून द्या.

**4.** अभिजात साहित्यातही पारंपरिक लौककलाविष्कारांचा समर्थ उपयोग कसा करून घेतलेला असतो, ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

साहित्यसमीक्षेतील लोकतत्त्वीय दृष्टिकोण विशद करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) विधीगीते

(ब) लळीत : परंपरा व स्वरूप

(क) महाराष्ट्राचे 'लोकसाहित्य' विषयक धोरण

(ड) रा.चिं. ढेरे यांचे लोकसाहित्यविषयक कार्य.

*किंवा*

(3) लेखनाविद्या व निबंधलेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** माणसाच्या दैनंदिन व्यवहारातील भाषा वापराची क्षेत्रे व स्वरूप विशद करा.

**किंवा**

मानवी जीवनातील भाषेची गरज व महत्व विशद करा.

**2.** 'एकविसाव्या शतकात मराठीचे वापर क्षेत्र विस्तारले आहे.' साधार लिहा.

**किंवा**

आधुनिक जीवनशैलीचा मराठी भाषेवर झालेला परिणाम सोदाहरण विशद करा.

**3.** खाजगी वाहिन्यांवरील (टीव्ही चॅनेल्स) मराठीचे स्वरूप लिहा.

**किंवा**

संपादनाची भाषिक कौशल्ये कोणती ते साधार लिहा.

**4.** निबंधलेखनात मुद्देसूदपणा, तार्किकता व सुसंगती कशी राखावी लागते, ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

जनसंपर्कासाठी कोणकोणती भाषिक कौशल्ये आवश्यक असतात ?

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) मराठी माणसांतील मराठीचे स्थान

(ब) साहित्याची भाषा

(क) अग्रलेखाची भाषा

(ड) जाहिरातीतील मराठी.

*किंवा*

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याच्या सामाजिक अभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास हा स्थल-काल संस्कृती सापेक्षरित्या करावयाचा असतो – कसे ते लिहा.

**2.** 'साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते' – सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

सामाजिक परिस्थिती आणि कलारूपे यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**3.** 'कालानुरूप नवनवीन काही वाङ्मयप्रकार अस्तित्वात येतात व काही लयाला जातात.' सकारण मीमांसा करा.

**किंवा**

राजाश्रय व साहित्यनिर्मिती यातील परस्परसंबंध विशद करा.

**4.** चळवळी व साहित्य यातील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याकडे पाहण्याचा परिस्थितीनिष्ठ दृष्टिकोणाची चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) साहित्य व सामाजिक मूल्ये

(ब) अभिरुचीविषयक प्रश्न

(क) वाचक आणि साहित्य परस्परसंबंध

(ड) साहित्यातील तंत्रात्मक प्रयोग.

*किंवा*

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. साहित्य निर्मिती प्रक्रियेसंदर्भातील राजशेखर व मम्मट यांच्या विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

कल्पकता व चमत्कृती यांचे साहित्य साहित्य निर्मिती-प्रक्रियेसंदर्भातील महत्व स्पष्ट करा.

2. साहित्य निर्मितीवर प्रसार माध्यमांचा कसा प्रभाव पडतो ? ते उदाहरणांसह लिहा.

**किंवा**

साहित्य निर्मितीमध्ये वंश, काळ व युगधर्म यांचा वाटा कसा व कितपत असतो ? याची चर्चा करा.

3. 'साहित्य निर्मिती जाणीवपूर्वक वा अजाणता' या विषयीच्या मतमतांतराचा परामर्श घ्या.

**किंवा**

साहित्य निर्मितीत प्रज्ञा व प्रतिभा यांचे योगदान कितपत असते ? ते लिहा.

4. 'भाषेचा सौंदर्यात्मक दृष्टीने केलेला वापर म्हणजे साहित्य निर्मिती' या दृष्टिकोणाचा परामर्श घ्या.

**किंवा**

साहित्य निर्मिती मागे कोणकोणते हेतू कार्यरत असतात ? ते लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) साहित्य निर्मितीतील समस्या

(ब) साहित्य निर्मितीतील कालतत्व

(क) साहित्य निर्मितीतील वाचकांचा सहभाग

(ड) साहित्य निर्मिती आणि वृत्तपत्रांची मागणी.